**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(सत्यवान इंथापे)
हं. सहायक जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२१
दिनांक : २३.११.२०२१

मुंबई शहरामध्ये Hop On – Hop Off – " Ho-Ho"
वातानुकूलित इलेक्ट्रिक पर्यटन बस सेवा

मुंबई, २३ - मुंबई शहरामध्ये येणा-या पर्यटकांना सुरक्षित आणि किफायतशीर पर्यटन बस सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून बेस्ट उपक्रमाने Hop On – Hop Off – " Ho-Ho" वातानुकूलित इलेक्ट्रिक पर्यटन बस सेवा सकाळी ९.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच जुहू चौपाटी याठिकाणांहून अर्ध्या तासाच्या अंतराने कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. या बससेवेचे पर्यटन शुल्क प्रति व्यक्ती, प्रति फेरी रुपये २५०/- इतके असून पर्यटकाने एखाद्या पर्यटनस्थळी बसगाडीतून उतरुन त्या स्थळाची पाहणी केल्यानंतर पुढच्या फेरीच्या बसगाडीतून पुढील पर्यटन स्थळापर्यंत प्रवास करु शकतात. सदर पर्यटन बससेवेव्यतिरिक्त देखील बेस्ट उपक्रमाच्या इतर बसमार्गांचा वापर करुन मुंबईतील प्रेक्षणीय स्थळे पर्यटकांना पाहता येतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून जिजामाता उद्यान (राणीबाग-भाऊ दाजी लाड वस्तूसंग्रहालय)- जुहु उद्यान- जुहू चौपाटी – वांद्रे बँड स्टँड- श्री सिद्धीविनायक मंदिर- नेहरू तारांगण- गिरगांव चौपाटी- तारापोरवाला मत्स्यालय मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय(म्युझियम) असा प्रवासमार्ग या बससेवेमध्ये निश्चित करण्यात आलेला असून त्याव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय – ग्लोरीया चर्च (भायखळा)– वांद्रे रेक्लमेशन – लिलावती रुग्णालय – सिनेकलाकारांचे बंगले - लिंकिंग रोड - जुहू रोड – राजीव गांधी सागरी सेतू – नेहरु तारांगण - हाजीअली – पेडर रोड - बाबुलनाथ मंदिर – वानखेडे स्टेडियम – नरीमन पॉइंट - मंत्रालय या प्रेक्षणीय स्थळांचे बसगाडीमधून दर्शन करविण्यात येणार आहे.

मुंबईकर नागरिकांनी बेस्ट उपक्रमाच्या या पर्यटन बससेवेच्या बसगाडीचे स्वरुप कसे असावे, ho ho bus ची बाह्यस्तरावर कलाकृती कशी असावी या दृष्टीने " Design Mumbai Ho Ho Bus Campaign "" अंतर्गत मुंबईकर जनता आणि कलावंत यांनी भाग घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे जेणेकरुन सदर बससेवा मुंबई शहराची ओळख बनावी यादृष्टीने आपल्या सर्जनशील सूचना probestundertaking@gmail.com या ईमेलवर ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत कळवाव्यात असे आवाहन करण्यात येत आहे. ज्या नागरिकाची सूचना स्वीकारण्यात येईल त्याला बेस्ट उपक्रमाकडून आकर्षक बक्षीस देऊन त्याचा सत्कार करण्यात येईल.